मुंबई : राज्याचे कृषी मंत्री एकनाथ खडसे यांनी आमीर खानचा ‘व्हिलन’ असा उल्लेख केला आहे. आमीर एसीपी राठोडसारखा आहे, असं आम्हाला वाटलं होतं, पण तो तर गुल्फाम हसन निघाला, अशी टीका खडसेंनी केली आहे. असहिष्णुतेच्या वक्तव्यावर आमीरवर

देशभरातून जोरदार टीका होत आहे. शिवाय आमीरने यावर स्पष्टीकरणही दिलं आहे. देश सोडून जाणार नाही, पण वक्तव्यावर ठाम असल्याचं आमीरने म्हटलं आहे. ‘सरफरोश’ सिनेमात आमीरने एसीपी राठोड ही हिरोची भूमिका साकारली होती. आमीरचं वक्तव्य दुर्दैवी आहे. इथल्या लोकांनी त्याच्यावर प्रचंड प्रेम केलं आहे. आमीरकडून ही अपेक्षा नव्हती. त्याने साकारलेली एसीपी राठोडची भूमिका अजूनही सगळ्यांच्या लक्षात आहे. आजपर्यंत आम्हाला आमीर खान एसीपी राठोडसारखा वाटायचा, पण तो तर गुल्फाम हसन निघाला, यांचं मला दु:ख  आहे, असं खडसे म्हणाले.